## महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) (१)(१ - अ) अन्वये आदेश

जा.क्र. सनिका/वि-१/नियमन /कलम ७७ (अ)/आदेश/२०१७<br>
कार्यालय सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कांरजा (घा.)<br>
ता. कारंजा (घा.), जि. वर्धा.<br>
दिनांक:- १३/०२/२०१७

वाचा क्र. १ :- महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) मधील तरतुद<br>
२:- श्री. एस. बी. ठाकरे, निवडणुक अधिकारी यांचा दिनांक 20/01/2017 चा निवडणुक अहवाल.

ज्या अर्थी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. बोरी ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० त्या खालील नियम १९६१ च्या तरतुदी नुसार नोंदणी झालेली असुन तीचा नोंदणी क्रमांक ३७३ आहे. सदर संस्थेला वर नमुद अधिनियम, व संस्थेची उपविधी यातील तरतुदी लागु असुन त्यानुसार संस्थेचे व्यवस्थापन चालणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी संस्थेच्या प्रशासकाचा कालावधी किंवा कार्यकाळ संपलेला असुन संस्थेची निवडणुक प्रक्रियेची पुर्तता होणे आवश्यक होते. त्या नुसार या कार्यालया मार्फत सदर संस्थेची निवडणुक दिनांक 3/11/2016 रोजी प्रक्रीया सुरू करण्यात आली. निवडणुक नामनिर्देशन पत्र हे उमेद्वाराकडुन अथवा सुचका मार्फत निवडणुक निर्णयअधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक होते.

ज्या अर्थी वाचा क्र. २ अन्वये सदर संस्थेकडुन नामनिर्देशन पत्र सादर करण्याच्या मुदतीत दिनांक १२/११/२०१६ ते १८/११/२०१६ या कालावधीत फक्त एकच नामनिर्देशन पत्र (श्री. विश्वनाथ मस्के यांचे) निवडणुक अधिकाऱ्याकडे प्राप्त झाले होते. त्यामुळे सदर संस्थेत कोरम पुर्ण होत नसल्याने व निवडणुक नियमाची पुर्तता न झाल्याचे दिसुन येत आहे.

आता त्या अर्थी वाचा क्र. १ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) (१)(१ - अ) नुसार संस्थेचे प्रशासन पहाण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्याचे नेमणुक करणे आवश्यक आहे. असे माझी खात्री असल्याने खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

!! आदेश !!

महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) (१)(१ - अ) मधिल तरतुदी नुसार तसेच महाराष्ट्र शासन सहकार व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय मुंबई यांचे आदेश क्र. सी. एस. एल./१४९३ / ११६२ / सी. आर. ४७ / १५ सी. दिनांक ०७/०८/१९९३ नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी डी. ए. शिरगावे, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कारंजा (घा.), ता. कारंजा जि. वर्धा, याद्वारे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. बोरी सदर संस्थेवर प्राधिकृत अधिकारी म्हणुन श्री. एस. बी. ठाकरे, सहकारी अधिकारी श्रेणी - २ अंतर्गत सहाय्यक निबंधक सह. संस्था कारंजा यांची नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांनी तात्काळ संस्थेचा प्रभार घेवुन महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० अंतर्गत नियम संस्थेचे उपविधी व या कार्यालयाने वेळोवेळी दिलेले आदेश सुचना नुसार कामकाज करावे व पुढील सहा महिण्यात संस्थेच्या संचालक मंडळाचे निवडणुक घ्यावी. व नविन समितीची रचना करावी.

सदर आदेश आज दिनांक १३/०२/२०१७ रोजी माझ्या सही शिक्क्या निशी देण्यात येत आहे.

स्थळ:- कारंजा (घा.)

(डी. ए. शिरगावे)<br>
सहाय्यक निबंधक<br>
सहकारी संस्था कारंजा (घा.)

१) श्री. एस. बी. ठाकरे, सहकारी अधिकारी श्रेणी - २ अंतर्गत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कारंजा यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी सदर संस्थेवर प्राधिकृत अधिकारी म्हणुन रूजु होउन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) सचिव विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था मर्या. बोरी र. क्र. ३७३ यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाही करीता रवाना.

प्रतिलिपी:-

मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा यांना माहिती करीता सविनय सादर.

OIC

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था कारंजा (घा.)